# आत्मचित्र – भाग ४१

(कै. राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून क्रमश)

साताऱ्याजवळील 'बुध' नावाच्या गावी मूळ घराणं असलेल्या; परंतु नंतर इंग्लंडमध्येच वास्तव्य असलेल्या श्री. मोतीलाल कोठारी नावाच्या गृहस्थांनी १९६० सालच्या ऑक्टोबरमध्ये 'महात्मा गांधी'च्या जीवनावर चित्रपट काढण्याचा संकल्प निश्चित केला आणि त्यावेळी ते इकडं भारतात आले. आपल्या इथल्या स्नेह्यांशी याबाबत बोलून शक्याशक्यतेची कल्पना पडताळून पाहून गेले.

प्रसिद्ध उद्योजक वसंतराव वर्दे आणि मोतीलाल कोठारी यांचा घनिष्ठ स्नेह. श्री.वर्दे यांना त्यांच्या व्यवसाय व्यापाराच्या निमित्तानं जर्मनी-इंग्लंडला जावं लागे आणि त्यांच्या आणि श्री.कोठारींच्या वरचेवर भेटी होत. वसंतराव वर्दे माझे साडू लागतात. त्यांनी माझी आणि श्री. कोठारींची ओळख करून दिलेली होती. मोतीलाल कोठारी 'इंडियन हायकमिशन्स ऑफिस'मध्ये काम करत असत. लंडनला ते स्थायिक झालेले होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापासून ते गांधीवादी होते. पुढे मि. रिचर्ड ॲटनबरो यांच्याशी श्री.कोठारी आणि श्री.वर्दे यांनी माझी ओळख करून दिली. त्यांच्या एकमेकांच्या जवळिकीच्या, विश्वासाच्या संबंधांमुळे माझा जसा श्री.कोठारींच्या बरोबर स्नेहाचा संबंध आला तसाच 'गांधी'या चित्रपटाच्या दिग्दर्शक-निर्मात्याशी जवळचा संबंध आला. या चित्रपटासाठीच्या बऱ्याच प्राथमिक आणि सतत वीस वर्षं होत राहिलेल्या भारतातील खटपटीमध्ये माझा व्यक्तिशः संबंध आला.

मोतीलाल कोठारी यांच्या मनात प्रथम ही कल्पना रुजण्यामागं एक व्यक्तिगत पार्श्वभूमी होती. त्यांनी १४ नोव्हेंबर १९६४ साली पाठविलेल्या एका खासगी निवेदनात म्हटलं आहे -

"Several years ago on being told that I had heart trouble, I resolved

to 'sell my life dearly'. I decided I had to try to do something, however small, which I believed to be a positive step for humanity. Like many thinking people all over the world, I felt powerless against the tide of violence in which the world is engulfed. I felt more than ever, the absence of Mahatma Gandhi from the world scene. If he were alive, I felt sure that he would have found a way, after having achieved his limited objective of Indian freedom to reach the masses all over the world."

हा चित्रपट व्हावा हा मोतीलाल कोठारींचा निश्चय दृढ झाला. १९६१च्या ऑक्टोबरमध्ये ते गांधी विचारांचे एक भक्त लुई फिशर याना भेटले. त्यांनी श्री.मोतीलाल कोठारींच्या या विचाराला दाद म्हणून 'दि लाईफ ऑफ महात्मा गांधी' या आपल्या पुस्तकावर आधारित चित्रपट करण्यासाठी एक डॉलरही न घेता अधिकार देऊ केले. श्री. कोठारी यांचा हुरूप द्विगुणीत झाला आणि १९६३च्या फेब्रुवारीत रीचर्ड ॲटन्बरो यांच्यासारख्या अभिनेता-निर्माता म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीनं ज्यावेळी पूर्ण सहकार्य देऊन हे चित्र निर्माण करून त्याचं दिग्दर्शन करण्यासही संमती दिली, त्यावेळी तर श्री.कोठारी यांना जणू काही हर्ष झाला. त्यांचा आत्मविश्वास दृढावला आणि रीचर्ड ॲटन्बरो यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पाच्या प्रयत्नांना वेग येऊ लागला.

महात्मा गांधीजींच्या जीवनावर चित्रपट काढला जाणार आहे, याबद्दलची पहिली प्रेस कॉन्फरन्स् दि.०७.०२.१९६५ रोजी मी पुण्यात 'पूनम हॉटेल'मध्ये बोलविली होती. पुण्यातील पत्रकार, समाजातील प्रथितयश व्यक्ती यांना आमंत्रित केलं होतं. श्री.कोठारी अर्थातच उपस्थित होते. त्यावेळी या चित्रपटाबद्दलची माहिती सांगताना माझ्या मनाला जे भावलं, ते मी बोलतो होतो. 'हा चित्रपट निर्माण करणाऱ्या या व्यक्ती परदेशात आहेत, दूर आहेत आणि हा चित्रपट जागतिक प्रदर्शनासाठी इंग्रजीत करायचा आहे, ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आणि लाभदायक आहे', असं मी आवर्जून सांगितलं. या प्रसंगानंतर पंधरा-सोळा वर्षांनी; 'परदेशी निर्माता गांधीजींच्या जीवनावर चित्रपट कसा काढू शकेल? असा चित्रपट काढण्यास भारतीय निर्माता असणंच आवश्यक आहे,' या मुद्द्यावर खूप वादंग माजलं होतं. चित्रपट उच्च श्रेणीचा झाला आणि त्याला अनेक सर्वोच्च पारितोषिकं मिळाली. यानंतर त्या विरोधाचा फोलपणा सिद्ध झाला आहे.

महात्मा गांधीजींच्या जीवनाशी संबंधित स्थळं पाहणं, व्यक्तींना भेटणं, गांधी फिल्म कमिटीवरील चित्रणाचं भांडार पाहणं, अशा साऱ्या प्रयत्नांत

मि.ॲटन्बरो त्यांचे सहकारी मित्र मि.मायकेल स्टन्ले ईव्हज् आणि श्री.कोठारी यांच्यासह अनेकदा इथं आले. त्या त्या वेळी मि.ॲटन्बरो यांच्यातली सखोल अभ्यासवृत्ती, चिकित्सक स्वभाव, चिकाटी, निरलस काम करण्याची जिद्द असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू एकत्र काम करण्यातून, सहवासातून आम्हांला दिसून येऊ लागले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारत, परकीय सत्तेच्या गुलामगिरीच्या विळख्यात जखडून गेलेल्या भारतीय जनतेच्या भावना आणि या सगळ्यापेक्षा गांधीजींच्यासारखं व्यक्तिमत्त्व या साऱ्या गोष्टी एका अभारतीय दिग्दर्शक-निर्मात्यानं जिव्हाळ्यानं, प्रामाणिकपणानं समजून घेणं हे महाकठीण काम होतं.

या साऱ्या प्रकल्पाच्या उभारणीत व्यावहारिक, आर्थिक, शासकीय क्षेत्रात, गांधीजींच्या जीवनाशी निगडीत अशा भारत, ब्रिटन, युरोप मधील मोठ्या व्यक्तींशी - प्रत्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांच्याशी आलेल्या संपर्काबद्दल, त्यांच्या प्रगतिपर दृष्टिकोनातून मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल, प्रत्यक्ष सहकार्याबद्दल स्वत: सर रिचर्ड ॲटन्बरो यांनी लिहिलेल्या पुस्तकात तपशीलवार खूप माहिती दिलेली आहे. या अठरा-वीस वर्षांच्या काळात श्री.मोतीलाल कोठारींचा एक स्नेही आणि या साऱ्या प्रकल्पाच्या उभारणीच्या अविरत प्रयत्नांतील एक सहकारी, जवळचा साक्षीदार म्हणून माझ्या मनावर ज्या गोष्टी बिंबून राहिल्या आहेत त्यांचाच उल्लेख मी करीत आहे.

गांधीजींच्या जीवनावर चित्रपट करणाऱ्या संस्थेच्या नावापासून एक वैशिष्ट्य आणि दृष्टिकोन प्रस्थापित होतो आहे. 'इन्डो-ब्रिटिश फिल्म्स' ! दीर्घ सांस्कृतिक परंपरा असलेल्या या दोन्ही देशांनी, दोन्हीकडील विचारवंतांनी एकत्र येऊन गांधीजींचं जीवन आणि कार्य यांवर चित्रपट करायचा निश्चय केल्याची सूचकता या नावात आहे. या चित्रपटाचं नांव 'महात्मा' किंवा आणखी काही विशेषणं न लावता परदेशात त्यांचं नांव जसं विदित आहे तसंच 'गांधी' हेच असावं, असा ॲटन्बरो यांचा आग्रह होता. जणू 'गांधी'या नावात सर्व काही आहे, अशी त्यांची धारणा होती. नावामागे गौरवाच्या विशेषणांची गरज आहे, असं त्यांना वाटलं नाही. भारत, भारतीय आणि गांधीजींचं व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी त्यांनी केलेला अभ्यास, गांधीजींच्या वास्तव्याशी संबंधित ठिकाणं प्रत्यक्ष पाहणं, त्यांच्या प्रत्यक्ष सहवासात आलेल्या व्यक्तींच्या भेटी घेऊन त्यांना बोलतं करणं आणि आठवणीतून व्यक्तिमत्त्व समजून घेणं या त्यांच्या प्रयत्नांतील चिकाटी, अविरत कष्ट याला खरोखरच तोड नाही. मला आठवतं चित्रणाच्या प्रसंगाच्या तपशीलाचा विचार करताना ते फार बारकावे अभ्यासत, हे मी पाहिलं. त्यासाठी



'गांधी' चित्रपटाच्या वेळी युनिटसह

ते दूरचे प्रवास करत, अपरिचित अशा या प्रदेशात चालत फिरत. अशातून चित्रपटातल्या प्रसंगांशी प्रत्यक्ष निगडीत नसतील अशाही गोष्टी आम्हांला कळून येत.

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, स्वभावाबद्दल आणि पं. जवाहरलालजींच्या संबंधांबद्दल एक गमतीची गोष्ट साबरमतीला महात्माजींच्या एका वृद्ध सहकाऱ्या-कडून कळली होती.

समाजकार्य आणि स्वातंत्र्य चळवळीच्या उठावाच्या काळातील दौऱ्यामध्ये एकदा महात्माजींचा आणि पंडितजींचा मुक्काम एका खेडेवजा ठिकाणी झाला. रात्री उशिरा पोहचून गांधीजी आणि पंडितजी आपले बिछाने पसरून झोपले होते. मुळातच उशीर झालेला. मध्यरात्रीच्या वेळी गांधीजींनी पाहिलं तर पंडितजी जागेच, अस्वस्थ, करवट बदलत होते.

गांधीजींनी विचारलं, "क्या बात है, नींद नहीं आ रही है?"

पंडितजी म्हणाले, "जी ! नही आ रही है।"

बापूजींनी विचारलं, "क्यूं ? कोई वजह?"

पंडितजी म्हणाले, "हां, कुछ सोच रहा हूँ ।"

पंडितजी : आपसे कुछ पूछना चाहता हूँ, लेकिन आप नाराज होंगे ।

बापूजी : मै और तुमसे नाराज? मै नाराज तो कभी नही होता, पूछो तो सही ।

पंडितजी : मै सोच रहा हूँ कई दिन, आज भी, जिन शक्स की प्रार्थना में, व्याख्यानों में सत्य और अहिंसा का उपदेश होता है, उनको रात को बिस्तर के पास लाठी रखने की जरूरत क्यूं होती है?

बापूजींनी थोडं थांबून मिस्किलपणं उत्तर दिलं, "हाँ, ऐसे आदमी को भी कभी कभी ऐसे शरारती बच्चे मिलते है, जो ऐसे अढेटेढे सवाल पूछते है। उनके लिये लाठी रखनी पडती है ।"

ही घटना साबरमतीच्या आश्रमाच्या परिसरात राहणाऱ्या गांधीजींच्या नव्वदी उलटलेल्या एका सहकाऱ्याने आम्हांला सांगितली आणि म्हणाले, "दुसरे दिवशी पंडितजींनीच आम्हांला ही हकीगत सांगितली होती."

महर्षी अण्णासाहेब कर्वे, सर विश्वेश्वरय्या, आचार्य विनोबा भावे अशा लोकोत्तर व्यक्तींच्या सहवासाचं भाग्य मला लाभलं आहे. मला वाटतं साऱ्या समाजाच्या हिताचं भान ठेवून त्या जबाबदारीचं ओझं वाहणाऱ्या अशा थोर व्यक्तींच्या स्वभावात एक जिवंत, निर्मळ खळखळणारी विनोदबुद्धी असते.

या 'गांधी' फिल्मच्या निर्मितीच्या योजनेच्या पाठपुराव्यामध्ये आठ-दहा

ते दूरचे प्रवास करत, अपरिचित अशा या प्रदेशात चालत फिरत. अशातून चित्रपटातल्या प्रसंगांशी प्रत्यक्ष निगडीत नसतील अशाही गोष्टी आम्हांला कळून येत.

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, स्वभावाबद्दल आणि पं. जवाहरलालजींच्या संबंधांबद्दल एक गमतीची गोष्ट साबरमतीला महात्माजींच्या एका वृद्ध सहकाऱ्या-कडून कळली होती.

समाजकार्य आणि स्वातंत्र्य चळवळीच्या उठावाच्या काळातील दौऱ्यामध्ये एकदा महात्माजींचा आणि पंडितजींचा मुक्काम एका खेडेवजा ठिकाणी झाला. रात्री उशिरा पोहचून गांधीजी आणि पंडितजी आपले बिछाने पसरून झोपले होते. मुळातच उशीर झालेला. मध्यरात्रीच्या वेळी गांधीजींनी पाहिलं तर पंडितजी जागेच, अस्वस्थ, करवट बदलत होते.

गांधीजींनी विचारलं, "क्या बात है, नींद नहीं आ रही है?"

पंडितजी म्हणाले, "जी ! नही आ रही है।"

बापूजींनी विचारलं, "क्यूं ? कोई वजह?"

पंडितजी म्हणाले, "हां, कुछ सोच रहा हूँ।"

पंडितजी : आपसे कुछ पूछना चाहता हूँ, लेकिन आप नाराज होंगे ।

बापूजी : मै और तुमसे नाराज? मै नाराज तो कभी नही होता, पूछो तो सही ।

पंडितजी : मै सोच रहा हूँ कई दिन, आज भी, जिन शक्स की प्रार्थना में, व्याख्यानों में सत्य और अहिंसा का उपदेश होता है, उनको रात को बिस्तर के पास लाठी रखने की जरूरत क्यूं होती है?

बापूजींनी थोडं थांबून मिस्किलपणं उत्तर दिलं, "हाँ, ऐसे आदमी को भी कभी कभी ऐसे शरारती बच्चे मिलते है, जो ऐसे अढेटेढे सवाल पूछते है। उनके लिये लाठी रखनी पडती है।"

ही घटना साबरमतीच्या आश्रमाच्या परिसरात राहणाऱ्या गांधीजींच्या नव्वदी उलटलेल्या एका सहकाऱ्याने आम्हांला सांगितली आणि म्हणाले, "दुसरे दिवशी पंडितजींनीच आम्हांला ही हकीगत सांगितली होती."

– वै. राम गबाले

('आत्मचित्र' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – अरुण जाखडे – २५४४२४५५)